# सोने खरेदी?...थोडे थांबा, विचार करून खरेदी करा

## रिद्धीसिद्धी बुलियनच्या पृथ्वीराज कोठारी यांचा दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर सल्ला

वैभव वझे / सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. २२ : सोने खरेदी करताना उतावळेपणा करून चालत नाही. सोन्याचा दागिना कोणत्या सराफाकडे चांगला मिळेल यासाठी ग्राहक सर्वसाधारणपणे चार ठिकाणी चौकशी करतो. ग्राहकाने त्याचा हा स्वभाव सोन्याची खरेदी करताना सध्याच्या परिस्थितीत वापरावा. सोने खरेदी करण्यापूर्वी थोडे थांबा, विचार करा आणि मगच सोने खरेदी करा, असा सल्ला बॉम्बे बुलियनचे माजी अध्यक्ष; तसेच रिद्धीसिद्धी बुलियन्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक पृथ्वीराज कोठारी यांनी गुंतवणूकदारांना दिला आहे.

सोनेखरेदीसाठी दसरा, धनत्रयोदशी व दिवाळी हे तीन महत्त्वाचे दिवस आता बाकी आहेत. परंतु अजूनही सोन्याचा भाव १० ग्रॅमसाठी किरकोळीत ३२ हजार रुपये सरासरी आहे. भारतीय रुपया अमेरिकी डॉलरच्या तुलनेत अद्यापि स्थिर वाटचाल करत नसल्याने लोकांच;ि तसेच बँकांचा ओढा सोन्याकडे वाढतो आहे. याचा परिणाम म्हणून सोन्याला प्रचंड प्रमाणात मागणी आहे व म्हणूनच सोन्याचा भाव कमी होण्याचे कोणतेही चिन्ह नाही. या पार्श्वभूमीवर पृथ्वीराज कोठारी म्हणाले, की सोने खरेदी करणे केव्हाही चांगले. परंतु ही खरेदी सोन्याचा भाव रिटेलमध्ये १० ग्रॅमसाठी २९ हजार ५०० ते ३० हजार रुपये असेल तेव्हाच करणे इष्ट आहे.

सोन्याचे दागिने करून ठेवून त्यायोगे गुंतवणूक करण्यापेक्षा सोन्यातील गुंतवणूक युनिट्सच्या अर्थात गोल्ड ईटीएफच्या माध्यमातून करण्यालाही कोठारी यांनी प्राधान्य दिले आहे. गोल्ड ईटीएफमध्ये गेल्या काही महिन्यांपासून मंदीचे वातावरण आहे. याचे कारण प्रत्यक्ष खरेदी केलेले सोने विकताना त्याला अधिक बाजारभाव मिळत आहे. असे असले तरी गोल्ड ईटीएफला आगामी काळात महत्त्व प्राप्त होणार आहे.

केंद्र सरकार सोन्याची आयात कमी व्हावी म्हणून जनतेचे मन वळवत आहे. परंतु यावर आक्षेप घेत कोठारी म्हणाले की, १२० कोटी जनता असलेल्या आपल्या देशात ९०० टन सोने आयात होते. याचा अर्थ माणशी खूपच कमी सोने आयात होते. त्यामुळे सरकारने याला आक्षेप घेण्याचे कारण नाही. घरात असलेले जुने दागिने मोडून त्यापासून नवे दागिने तयार करण्याचा नवा ट्रेंड बाजारात असून त्याचबरोबर सोन्याची नाणी विकत घेऊन त्याद्वारे सोन्याची साठवणूक करण्याकडे तरुणाईचा कल वाढतो आहे, असे मत काही सराफांनी नोंदवले आहे.

सोन्याची नाणी विकत घेण्यात फायदा आहे. विशेषतः सीलबंद नाणी विकत घेतल्यास व भविष्यात दागिने करण्यासाठी हे सोने दिल्यास त्यात घट येत नाही. तसेच ते २४ कॅरेटचे असल्यामुळे अत्यंत शुद्ध असते. त्यामुळे त्या सोन्यात अन्य धातू मिसळून अधिक दागिने घडविता येतात.

### जुन्या सोन्याला मागणी




**जुन्या सोन्याचे मार्केट झपाट्याने वाढते आहे. आपल्याजवळ असलेले सोने जितके जुने तितके ते अधिक शुद्ध असे मानले जाते. त्यामुळे सध्याच्या काळात जुने दागिने देऊन त्यापासून नवे दागिने तयार करण्याची किंवा जुने सोने विकून अधिक पैसे कमावण्याची चलती आहे. जुन्या सोन्याची शुद्धता अधिक दिसून येत असल्यामुळे किंवा जुन्या समजुतीनुसार अधिकाधिक शुद्ध सोन्याचेच दागिने तयार केले जात असल्यामुळे असे सोने विकताना चांगला भाव मिळत आहे. किंबहुना अनेक सराफ असे जुने सोने आवर्जून खरेदी करतानाही दिसत आहेत.**